MHNS130008692022 रे.मु.क्र.२०५/२०२२
रेखा वि. बाळू

## निशाणी क्र.४४ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ व ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१, २ व ५ यांनी प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे मांडले. अर्ज व म्हणणे वाचले. वादीचे कथन की, वादीने त्यांचे मयत वडील त्रंबक शिवराम वाघ यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांचा अविभक्त हिस्सा वाटप व तुटक होवून त्याचा कब्जा मिळण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. वादीच्या वडिलांना रे.मू.नं.१४७/२०१६ मधील समजूतीच्या हुकुमनाम्याप्रमाणे वादीच्या वडिलांना मौजे वावी येथे गट नं.२१७/१ व गट नं.२१७/६ मिळकती दिल्या त्यापैकी प्रतिवादी क्र.५ हिने गट नं.२१७/१ या मिळकतीचे दि.०६.०५.२०१९ रोजी दस्त नं.५४२/२०१९ बाबत दाव्यातील विनंती कलमात १२ब प्रमाणे मागणी केलेली आहे.

३. वादीचे पुढे कथन की, सदर खरेदी खतास वादी पक्षकार नाही. त्यामुळे सदरचा दस्तऐवज वादीच्या हिश्यावर बंधनकारक होवू शकत नाही. त्यामुळे विनंती कलमात दि.०६.०५.२०१९ चे खरेदी खत हे ''बेकायदेशीर व रद्द बातल'' लिहिण्याची आवश्यकता नव्हती. वादीने दाव्याची आकारणी त्याप्रमाणे केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे वादीने दाव्यात व विनंती कलमात खरेदी खताबाबत लिहिण्यात आलेला मजकूर की ''बेकायदेशीर व रद्द बातल'' वगळण्याची विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१, २ व ५ यांनी हरकत घेतली असून अर्जातील संपूर्ण मजकूर नकारलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चे कथन की, अर्जात नमूद केल्याप्रमाणेचे कथन वगळता येत नाही. प्रतिवादी क्र.५ चे कथन की, दुरुस्तीसाठी कोणतेही कारण घडलेले नाही व अगोदर केलेले कथन दुरुस्ती अर्जाद्वारे आता वगळता येणार नाही. करिता प्रतिवादी क्र.१, २ व ५ यांनी त्यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. तसेच अर्ज मंजूर करण्याचे

मत झाल्यास जास्तीत जास्त दंड आकारण्याची विनंती केली आहे.

५. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख, दाखल कागदपत्रे व नियोजित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा त्यांचा अविभक्त हिस्सा वाटप व तुटक होवून त्याचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.५ यांनी दावा कलम १ब गट नं.२१७/१ बाबत दि.०६.०५.२०१९ रोजीचे खरेदी खत पोकळीस्त बिन भरण्याचे बेकायदेशीर व रद्द बातल असल्याचे कथन करत विनंती कलम १२ब ते खरेदी खत पोकळीस्त बिन भरण्याचे बेकायदेशीर व रद्द बातल असून वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहिर होवून मिळण्याची विनंती केल्याचे दिसते. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच आपले कथन सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी वादीची असल्याकारणाने, सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच झालेला विलंब व गैरसोय यांची भरपाई केली जावू शकते. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## आ दे श

**१.** निशाणी क्र.४४ वरील अर्ज रक्कम रुपये ३००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

**२.** खर्चाची रक्कम रुपये ३००/— वादीने विधी सेवा केंद्र यांच्याकडे जमा करावी. त्यानंतर वादीने प्रस्तावीत दावा दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याची प्रत १४ दिवसांच्या आत दाखल करावी.

स्वाक्षरी /—XXX

**( व. वा. खेंदाड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पिंपळगाव(ब)

दिनांक :— २१/०१/२०२६.
ठिकाण :— पिंपळगाव(ब)